लांजा पंचायत समिती (जि.रत्नागिरी)
नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास
प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंसई-२०१६/प्र.क्र.२२३/बांध-४
५ वा मजला, मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख : २४ जुलै, २०१९

वाचा :-

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे पत्र क्रमांकः रजिप/बांधकाम/पीओ-१/१६०२/२०१७, दिनांक १६ मार्च, २०१७.

प्रस्तावना :-

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी उक्त वाचा मधील दिनांक १६ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये लांजा पंचायती समिती, जिल्हा रत्नागिरी नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विनंती केली आहे.

०२. लांजा पंचायत समितीची अस्तित्वातील इमारत जीर्ण झाल्यामुळे व सदर इमारत प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने अपुरी असल्याने कामकाजामध्ये गैरसोयीचे ठरत आहे. त्यामुळे नवीन प्रशासकिय इमारत बांधकाम करण्याकरिता लांजा पंचायत समितीने दिनांक २७.०४.२०१६ रोजी ठराव क्रमांक ५८७ पारित केला आहे. सदर पंचायत समितीची नवीन प्रशासकिय इमारत बांधकाम गट क्रमांक ३५२९ या जागेत प्रस्तावित आहे. लांजा पंचायत समिती "क" वर्गात मोडते. त्यानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी पंचायत समिती लांजा नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाकरिता मुख्य वास्तुशास्त्रज्ञ सा.बां.वि. मुंबई यांच्याकडील जॉब नं.rtg-४५१/१/डीआरजी नं-४ या नमुन्या नकाशाच्या आधारित तळमजला २७१.०२ चौ.मी., पहिला मजला ५०३.२६ चौ.मी. व दुसरा मजला ५२३.२६ चौ.मी. असे एकूण १२७७.५४ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम प्रस्तावित केले आहे. याकरिता एकूण रू.४१०.५० लक्ष किंमतीचे सविस्तर अंदाजपत्रक सादर केले आहे. यामध्ये DSIMANTLING, QUILITY CONTROL TEST, ROADS वगैरे यांचा समावेश आहे. याबाबी इतर पंचायत समितींच्या नवीन प्रशासकिय इमारत बांधकामास मान्यता देतांना वगळण्यात येत असल्यामुळे, या बाबी वगळून खालीलप्रमाणे इतर पंचायत समितींना प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार प्रशासकीय मान्यता देणे योग्य होईल. सदर अदांजपत्रक सन २०१५-१६ च्या दरसूचीवर आधारित असून ते उप अभियंता व कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी सांक्षाकित केले आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी प्रस्तावासोबत पंचायत समितीच्या ठरावाची प्रत, नमुना

नकाशाची प्रत, जागेचा उतारा, ले आऊट प्लॅन व जुन्या इमारतीचे फोटो इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत.

०३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या छाननी अंती, लांजा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामासाठी एकूण रुपये ३८०.५५ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

लांजा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी एकूण रुपये ३,८०,५५,०००/- (रुपये तीन कोटी ऐंशी लक्ष पंचावन्न हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या बांधकामास पुढील अटींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बांधकामास तांत्रिक मान्यता देण्यापुर्वी संकल्पन तपासून घेणे आवश्यक राहील.

२) प्रस्तुत इमारतीचे बांधकाम मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां.मंडळ, मुंबई यांच्याकडील विहित नमुना आराखड्यानुसार हाती घेण्यापूर्वी, स्थानिक नगररचना प्राधिकरणाची तसचे अग्निशमन यंत्रणेची मंजुरी घेणे बंधनकारक राहील.

३) नियोजित आराखड्यात महिला पदाधिकाऱ्यासाठी प्रसाधनगृहासह विश्रांती कक्षाचे संकल्पन करण्यात येवून, सदर व्यवस्था इमारतीमध्ये निर्माण करण्यात यावी.

४) प्रस्तुत प्रशासकीय इमारत बांधकामामध्ये ग्रीन बिल्डींग संकल्पना अंमलात आणून, नैसर्गिक प्रकाशयोजना व वायुवीजन, पाण्याच्या व उर्जेच्या वापरात काटकसर, पर्जन्य जलपुन:र्भरण आणि जास्तीत जास्त पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य व साधन-सामुग्रीचा वापर करणे आवश्यक राहील.

५) प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून जास्तीत जास्त दोन वर्षात पूर्ण होईल, असे नियोजन करून, इमारत बांधकामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी.

६) या प्रकरणी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली जाणार नसल्याने, मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीतच काम पूर्ण करण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध), जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी.

७) या कामी प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक खर्च झाल्यास तो संबंधित पंचायत समिती/जिल्हा परिषदेने सोसावा.

८) प्रस्तुत प्रशासकीय इमारतीमध्ये अपंगांना सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रॅम्प, रेलींग व तत्सम सुविधा निर्माण करणे बंधनकारक राहील.

९) प्रत्यक्ष इमारतीचे बांधकाम करतेवेळी पर्यावरण विभाग क्र.ईएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१/दि.१०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

०२. लांजा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकाचा सर्वसाधारण गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

General Abstract For Construction of Lanja P. S. Administrative Building		
Sr. No.	**Description of Item**	**Cost (In Rs.)**
1	COST OF WORK PORTION	27484665.00
2	ADD 11% FOR ELECTRIFICATION	3023313.15
3	ADD 8% FOR WATERSUPPLY & SANITATION	2198773.20
4	ADD 2% FOR RAINWATER HARVESTING & FIRE FIGHTING	549693.30
5	ADD 6% PRICE VARIATION	1649079.90
6	ADD 4% FOR CONTINGENCIES	1099386.60
7	ADD 2% FOR COMPUTERISATION	549693.30
	TOTAL	36554604.45
8	LIFT MACHINARY	1500000.00
	TOTAL COST	**38054604.45**
	SAYS Rs.	**3,80,55,000.00**

०३. उपरोक्त बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर, अनुदान स्वरूपात टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जाणार असून, तो उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे वितरीत करण्यात येईल. यावरील खर्च "२५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

०४. या कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्वरेने तांत्रिक मान्यता घेण्यात येऊन त्याची प्रत शासनास सादर करावी.

०५. प्रस्तुत कामाची माहिती कंस्ट्रक्शन ट्रॅकर प्रणालीवर अद्ययावत करावी.

०६. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पाच, अनुक्रमांक १, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ खाली, प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७२४१०५८३७०५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2019.07.24 11:30:07 +05'30'

(दि.बा.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधान परिषद.
२. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण.
३. महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
४. मुख्य अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो.,कॅम्प ऑफिस, मध्यवर्ती इमारत, पुणे.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
६. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
८. कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, रत्नागिरी.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा रत्नागिरी.
१०.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, रत्नागिरी.
११.उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण विभाग, नवी मुंबई.
१२.जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, रत्नागिरी.
१३.सभापती, पंचायत समिती, लांजा, जिल्हा रत्नागिरी.
१४.गट विकास अधिकारी, पंचायत समिती लांजा, जिल्हा रत्नागिरी.
१५.निवडनस्ती, कार्यासन बांध-४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.